MHOS190003722026

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२४२/२०२६ मधील</u>**
**<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**
**<u>(CNRNo.MHOS190003722026)</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट मधील कलम २ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

<u>अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे</u> -

२. अर्जदार क्र.१ ही कै. नागनाथ दत्तात्रय साळुंके यांची आई असून अर्जदार क्र. २ ही पत्नी आहे तर अर्जदार क्र. ३ हा मुलगा व अर्जदार क्र. ४ ही मुलगी आहे. कै. नागनाथ दत्तात्रय साळुंके हे दि.२८.०४.२०२५ रोजी चंदन न्युरो सायन्स, सोलापूर येथे मयत झाले आहेत. मयत नागनाथ दत्तात्रय साळुंके यांचे मृत्युपुर्वीचे कायमचे वास्तव्य हे मौजे बोरगांव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव होते. मयत नागनाथ दत्तात्रय साळुंके यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकिय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व वारसप्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे देण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यानंतर दि.२५.०३.२०२६ रोजी 'दै. संघर्ष', धाराशिव या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रकाशीत करून आक्षेप

मागवणेत आले. परंतु, आजपर्यंत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

४. अर्जदार यांनी अर्ज शाबीत करणेकरीता अर्जदार क्र.१ चंद्रकला दत्तात्रय साळुंके यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११ वर, साक्षीदार क्र.१ मधुकर नागाप्पा सुतार यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१२ वर व साक्षीदार क्र. २ बाबु बलभिम सोमवंशी यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१३ वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी तोंडी पुरावा संपल्याची पुरसीस नि. क्र.१४ वर दाखल केली आहे.

५. अर्जदार यांचे विधीज्ञ श्रीमती. ए. पी. मोहळकर यांनी युक्तीवाद केला. अर्जदार खालील कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहेत.

१) उपनिबंधक जन्मु-मृत्यु कार्यालय, सोलापूर महानगरपालीका सोलापूर यांनी दिलेले मयत नागनाथ दत्तात्रय साळुंके यांचे मृत्युप्रमाणपत्र नि. १६/१ वर दाखल केले आहे.

२) दै. आम संघर्ष टाईम्स', धाराशिव या वृत्तपत्रामधील दि.२५.०३.२०२६ रोजीचे आवृत्तीमधील जाहीर प्रगटन नि.१० वर दाखल आहे.

६. प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ चंद्रकला दत्तात्रय साळुंके यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११ वर, साक्षीदार क्र.१ मधुकर नागाप्पा सुतार यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१२ वर व साक्षीदार क्र. २ बाबु बलभिम सोमवंशी यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१३ वर दाखल केले असून त्यांच्या पुराव्यावरून कै. नागनाथ दत्तात्रय साळुंके हे दि.२८.०४.२०२५ रोजी मयत झाले असून अर्जदार यांचे व्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही वारस नाहीत असे दिसुन येते. अर्जदार यांनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा अबाधीत आणि अखंड विना आव्हानीत राहिलेला आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या पुराव्यावरून अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत नागनाथ

दत्तात्रय साळुंके यांचे कायदेशीर वारसदार असल्याचे अर्जदार यांनी शाबीत केले आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ चंद्रकला दत्तात्रय साळुंके, अर्जदार क्र. २ सुप्रिया नागनाथ साळुंके, अर्जदार क्र. ३ रघुपती नागनाथ साळुंके व अर्जदार क्र. ४ सई नागनाथ साळुंके हे मयत नागनाथ दत्तात्रय साळुंके यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येते.

३. अर्जदार यांच्या नावे वारसप्रमाणपत्र अर्जदारांकडुन नियमाप्रमाणे न्यायालयीन मुद्रांक शुल्क घेऊन देण्यात यावे.

AWASEKAR SWATI DILIPRAO

Digitally signed by AWASEKAR SWATI DILIPRAO
Date: 2026.07.02 17:10:21 +0530

ठिकाण - तुळजापूर
दिनांक – ०२/०७/२०२६

(श्रीमती. एस.डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order/issues are same, word to word, as per the original judgment/order/issues.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S. D. Awasekar<br>Civil Judge Senior Division, Tuljapur, District - Osmanabad. |
| Date | --- | 02/07/2026 |
| Judgment/order/issues signed by the Presiding Officer on | --- | 02/07/2026 |
| Judgment/order/issues uploaded on | --- | 02/07/2026 |